# हाडाच्या कॅन्सरवर शस्त्रक्रियेने उपचार

## शरिरातील सर्वात मोठे हाड जोडले शस्त्रक्रियेने, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला पायावर उभे राहता आले

प्रतिनिधी
मुंबई

शरिरातील कोणत्याही अवयवाला कॅन्सर जडल्याचे समजल्यावर सामान्य रुग्णाची जी अवस्था होते, तीच अवस्था मांडुप येथे राहणाऱ्या गावडे यांची झाली. शरिरातील सर्वात लांब असणाऱ्या मांडीच्या हाडाला कॅन्सर झाल्याने गावडेंना उपचार आणि भविष्याबद्दल काही सुचत नव्हते. अपंगत्व देखील येऊ शकते या विचारांनी त्यांना ग्रासले असतानाच नानावटी येथील डॉ. हरेश मंगलांनी यांनी त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया केली. तर नानावटी रुग्णालयाने विशेष रुग्ण म्हणून दखल घेत शस्त्रक्रियेला मदत केली. आज तीन महिन्यानंतर ते पायावर उभे राहू शकले.

गावडे यांच्या प्रकरणात निराशा विरुद्ध आशा असा खेळ सुरू होता. गावडे यांच्या मांडीच्या हाडाला कर्करोग झाल्याचे निदान झाल्यावर त्यांच्या समोर उपचारापासून भविष्यापर्यंत विचार येऊ लागले.

दरम्यान, टाटा रुग्णालयातील फेऱ्याही वाढू लागल्या होत्या. त्यांच्या मांडीच्या हाडाला ट्युमरची गाठ असल्याचे निदान करण्यात आले होते. दरम्यान, टाटा रुग्णालयात बायोप्सी उपचार सुरू होते. हा ट्युमर वाढत असून त्याचा प्रसार होत असल्याचे वारंवार समोर येत होते. शिवाय तीन-चार केमोथेरपीदेखील करण्यात आली होती. हाडतज्ज्ञ डॉ. आर. गोपाल यांचे उपचार सुरू होते. केमोथेरपी नंतर गावडे यांच्या मांडीवर शस्त्रक्रिया करण्यात आली. ऑर्थोपिडीक तज्ज्ञ डॉ. हरेश मंगलांनी यांनी त्यांच्या मांडीवर शस्त्रक्रिया केली. डॉ. मंगलांनी यांनी पायाचे स्नायू आणि रक्त पुरवठा करणाऱ्या पेशींना न दुखवता शस्त्रक्रिया केली. कॅन्सरग्रस्त असलेला भाग काढून त्या हाडाला जोड देण्यात आली.

हाडातील कॅन्सर प्रसाराचा धोका, ब्लड प्रेशर आणि १८ सेमी लांब असलेले ते हाड पाच तास शस्त्रक्रिया करून काढण्याचे आव्हान पेलण्यात आले खरे. मात्र, रुग्ण समाधानी असल्याचे डॉ. हरेश मंगलांनी यांनी सांगितले. कॅन्सर प्रसाराचा धोका लक्षात घेऊन ती गाठ हेरून शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, मांडीच्या हाडाचे फ्रॅक्चर वाचविल्याचे समाधान आहे.